**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७००/०२**

**श्री.शंकर बाबू झुजम**
**वालनाई कॉलनी, रू.नं.६२०,**
**ओर्लेम चर्च समोर, मार्वे रोड,**
**मालाड (प), मुंबई - ४०० ०६४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**औद्योगिक न्यायालय,**
**प्रशायकीय इमारत, १ ला मजला,**
**चेतना कॉलेजजवळ, सरकारी वसाहत,**
**वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मा.ॲडमिनिस्टेटिव्ह जर्ज,**
**औद्योगिक न्यायालय,**
**प्रशायकीय इमारत, १ ला मजला,**
**चेतना कॉलेजजवळ, सरकारी वसाहत,**
**वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शंकर बाबू झुजम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०२.२००८ रोजी अर्ज करुन तक्रारदार व उत्तरवादी यांचे मा. १२ व्या कामगार न्यायालय, मुंबई यांनी नोंदविलेल्या विवरणपत्राची प्रत, मा.औद्योगीक न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे दि.२८.०३.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली.

"अपीलकाराच्या अर्जातील मुद्या क्र.१ ते ३ बाबत प्रकरण तपासणीअंती दिसून आले की, त्यामध्ये एक गोपनीय लिफाफा असून त्यावर "This packet contains the doc. From the date of hearing 10.12.2003 to 03.02.2004" असे नमुद केले आहे. तसेच सदर लिफाफा हा फाटलेल्या अवस्थेत असून

त्यामध्ये कोणतेही कागदपत्रे नाहीत. यावरुन असे दिसून येते की, सदर प्रकरणामध्ये गोपनीय चौकशी झाली असावी. त्यामुळे अर्जदाराने मागीतलेली माहिती क्र.१ ते २ ही गोपनीय स्वरुपाची असल्याने तसेच प्रकरण न्यायप्रविष्ठ व प्रलंबित असल्यामुळे सदर माहिती पुरविता येत नाही. अनुक्रमांक ३ ची माहिती म्हणजे मा.औद्योगीक न्यायालय, मुंबई यांचे प्रकरण न्यायालय क्र.१२ मधून न्यायालय क्र.९ मध्ये वर्ग करण्याबाबतचे आदेशाची प्रत अपीलकारास देण्यात येत आहे."

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.१७.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.३०.०४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसू येते की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती सीलबंद पाकीटात ठेवण्यात आली होती. ते पाकीट कोणीतरी पाहून आतील दस्त नेत्यामुळे ती अपीलकारास उपलब्ध करुन देता येत नाहीत असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. जबाब बंद लिफाफामध्ये ठेवण्यात आला होता. तो लिफाफा कोणीतरी फाडून त्यातील जबाबाचे कागद नेले असल्याने त्यास कोण जबाबदार आहेत त्याबाबत खाते चौकशी चालू आहे. यामुळे अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती देता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी केलेले प्रतिपादन लक्षात घेउन सदर प्रकरणी मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६९८/०२**

**श्री.शेख अझिमुद्‌दीन,**
**७०१/आर-२, समता को.हौ.सो,**
**मिठा नगर, गोरेगांव (प), मुंबई ४०० ०९०.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**मिठानगर, गोरेगांव (प),**
**मुंबई - ४०० ०९०.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**मिठानगर, गोरेगांव (प),**
**मुंबई - ४०० ०९०.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शेख अझिमुद्‌दीन यांनी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०४.२००८ रोजी अर्ज करुन समता सहकारी गृहनिर्माण संस्था, मीठानगर सहकारी गृहनिर्माण संस्था व गावदेवी सहकारी गृहनिर्माण संस्थाबाबत झोपडपट्‌टी पुनर्वसन योजना राबविण्यासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीसाठी पूर्वसूचना देवून कार्यालयीन वेळेमध्ये जन माहिती अधिका-यांना भेटण्याबाबत दि.१३.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, पी/दक्षिण यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.२६.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१८.०६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. परिशिष्ट-२ व उपलब्ध कागदपत्राच्या

छायांप्रती अपीलकारास द्याव्यात असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२७.०६.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे ब्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीपैकी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले, तसेच अपीलातील कागदपत्रातील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन समता, गावदेवी आणि मिठानगर सहकारी गृहनिर्माण संस्थांना झोपडपट्टी पुनर्वसन योजना रावविण्यातबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. तसेच सदर ठीकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत, परिशिष्ट-२ ची प्रत मागीतली होती. सदर माहिती अपीलकारास पुरविण्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी, पी/दक्षिण यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६९९/०२**

**श्री.शेख अझिमुद्दीन,**
**७०१/आर-२, समता को.हौ.सो,**
**मिठा नगर, गोरेगांव (प), मुंबई ४०० ०९०. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**मिठानगर, गोरेगांव (प),**
**मुंबई - ४०० ०९०.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**मिठानगर, गोरेगांव (प),**
**मुंबई - ४०० ०९०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शेख अझिमुद्दीन यांनी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०४.२००८ रोजी अर्ज करुन गोरेगाव येथील गावदेवी गृहनिर्माण संस्थेला झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागीतलेल्या माहितीसाठी पुर्वसूचना देवून कार्यालयीन वेळेमध्ये भेटण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.०३.०६.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१८.०६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अर्जातील मुद्दा क्र.१, २ व ३ अनुसार प्रश्नोत्तर स्वरुपाची मागीतलेली माहिती उक्त अधिनिमांतर्गत येत नसल्याने जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. यांचे प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी समर्थन केले. अर्जात मुद्दा क्र.४ आणि ५ बाबत अपीलाकारास ७ दिवसाचे आत माहिती द्यावी असे दि.२७.०६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांतील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ बाबत प्रश्नोत्तराच्या कारणावरुन माहिती नाकारली. जन माहिती अधिका-यांच्या सदर भुमीकेचे प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी समर्थन केले. अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ बाबत अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेश देउनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी पी/दक्षिा यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनिमातील कलम २० अन्वये शास्ती लादण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७०२/०२**

**श्री. प्रशांत एम.देशमुख**
**इ-१०, शॉपर्स स्पॉट,**
**जन.अे.के.वैद्य मार्ग, दिडोंशी कोर्ट,**
**जवळ, मालाड (पू),**
**मुंबई ४०० ०९७.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/साउथ वॉर्ड, मिठानगर म.न.पा.शाळा इमारत,**
**गोरेगांव (प), मुंबई - ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/साउथ वॉर्ड, मिठानगर म.न.पा.शाळा इमारत,**
**गोरेगांव (प), मुंबई - ४०० ०६२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. (ॲड) प्रशांत एम.देशमुख यांनी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०५.२००८ रोजी अर्ज करुन इमारत क्र.सी/२८, प्लॅट क्र.बी-००३, आर.एम.एम.एस.सेक्टर, गोरेगांव (पू), मुंबई येथे श्री.पुंडलिक मालवणकर यांनी त्यांच्या सदनिकेमध्ये केलेल्या अवैद्य बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्याने याबाबत माहितीच्या अधिकारानुसार माहिती देणे अपेक्षीत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.३०.०६.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२२.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०६.०८.२००८

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समर्थन करुन अपील निकालात काढले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.  सदर अपीलावर दि.०९.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते.  अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने सदनिकेतन केलेल्या अवैद्य कामाबाबत माहिती मागीतली होती.  अपीलकाराने मागीतलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती नाकारली आहे.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.  अन्यथा केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६९७/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई - ४०० ०१९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६, भाउ दाजी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/उत्तर विभाग कार्यालय,**
**९६, भाउ दाजी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारात दि.२७.११.२००७ रोजी अर्ज करुन करुन राजबागमधील बेसमेंट कारपार्किंग आणि बिल्डींग कंम्लीशन सर्टीफीकेटबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

आवश्यक माहितीकरिता कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव) (शहर) यांचे कार्यालय ई विभाग विभाग कार्यालय, भायखळा अग्निशमन दल, भायखळा येथे संपर्क साधल्यास माहिती उपलब्ध होईल. आराखडयात बेसमेंट कार पार्किंगची व्यवस्था ही कार लिफ्टच्या सहाय्याने दिलेली आढळले असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.२६.१२.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, म.न.पा.एफ/उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई यांचेकडे दि.०८.०१.२००८ रोजी प्रथम अपील दखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२३.०१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सदर इमारतीमध्ये कार पार्किंग, कार लिफ्ट व बेसमेंट

इत्यादी ठीकाणच्या बांधकामाबाबत मंजूर आराखडयाव्यतिरिक्त त्याठिकाणी नियमबाहया बांधकाम असल्यास ते हटविण्याबाबतची कारवाई करण्यात यावी व तसे अपीलकारास कळविण्यात यावे असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अनधीकृत बांधकाम हटविण्याची कारवाई केली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन राजबाग इमारतीमधील कारपार्किंग, कार लिफ्ट व बेसमेंट इत्यादि ठिकाणच्या अनधीकृत बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मंजूर आराखडयाव्यतिरिक्त त्याठिकाणी नियमबाहया बांधकाम असल्यास ते हटविण्याबाबतची कारवाई करण्यात यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास कळविलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६३१/०२**

**डॉ.अशोक गजानन लांजेवार**
**एम-५ प्रिमियम प्लाझा खरे टाउन,**
**धरमपेठ नागपूर - ४४० ०१०.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उद्योग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उद्योग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार डॉ. अशोक गजानन लांजेवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.१०.१२.२००७ रोजी अर्ज करुन औष्णीक विद्यूत केंद्र, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित खापरखेडा येथील भ्रष्टाचारासंदर्भातील तक्रारीबाबत एकूण ४ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२१ जानेवारी, २००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. परंतू आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.१०.१२.२००७ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित खापरखेडा येथील भ्रष्टाचाराबध्दल तक्रारीबाबत एकूण ४ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देता की, जन माहिती अधिका-यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.३ व ४ बाबत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६१६/०२**

**श्री.प्रदीप रेवाराम सहारे**
**राहुलवाचनालय जवळ, खळाशी लाईन,**
**लालाचा बाग, मोहन नगर, नागपूर - ४४० ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मनुष्यबळ विकास विभाग**
**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या.**
**कृपनिधी, बेलार्ड इस्टेट, ९ वालचंद हिराचंद मार्ग,**
**मुंबई - ४०० ०००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मनुष्यबळ विकास विभाग**
**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या.**
**कृपनिधी, बेलार्ड इस्टेट, ९ वालचंद हिराचंद मार्ग,**
**मुंबई - ४०० ०००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रदिप रेवाराम सहारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.२७.१०.२००७ रोजी अर्ज करून अपीलकारास दि.०१.०१.२००३ व दि.०१.१२.२००४ या कालावधीत उप व्यवस्थापक पदावर पदोन्नती मिळाली नसल्याने अनुषंगीक माहिती मागीतली होती.

माहितीच्या अधिकारातील अर्जावर चिकटविलेले कोर्ट फी स्टँप वैद्य नसल्यामुळे अर्ज निकालात काढण्यात आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१३.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर

अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये दि.३०.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन उप व्यवस्थापक पदावर त्यांना पदोन्नती दिली नसल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६१७/०२**

**श्री.अशोक ज्ञानेश्वर वाटेकर**
**रामनगर, मरारटोली, अग्रसेन भवनाच्या मागे,**
**नागपूर - ४४० ०१०.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**रोजगार व स्वंयरोजगार विभाग,**
**नविन प्रशासन भवन, १४ वा मजला, मंत्रालयसमोर,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**रोजगार व स्वंयरोजगार विभाग,**
**नविन प्रशासन भवन, १४ वा मजला, मंत्रालयसमोर,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अशोक ज्ञानेश्वर वाटेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.०३.१०.२००७ रोजी अर्ज करून श्री.वि.गो.झोडे, सह सचिव, रोजगार व स्वंयरोजगार विभाग यांच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

श्री.वि.गो.झोडे, सह सचिव यांचे जात प्रमाणपत्र विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर यांनी वैद्य ठरविले असून त्यांची हलबा ही जात अनुसूचित जमातीत असल्याचे त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंदविले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.२९.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांने विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरन्सीग रुममध्ये

दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजि करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेउन असे दिसून येते की, अपीलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करुन श्री.वि.गो.झोडे, सह सचिव, रोजगार व स्वंयरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने अपीलकारास दि.२९.१२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सुनावणीकरिता अपीलकार हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील अमान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२७/०२**

**श्री.मुकुंद नानिवडेकर**
**राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय,**
**मेन रोड, सीताबर्डी, नागपूर-१.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.मुकुंद नानिवडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन ग्रंथालयांना दुप्पट अनुदान देण्याचा निर्णय घेउन १२०० ग्रंथालयांना त्यापासून वंचीत ठेवल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१२ जून, २००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन ग्रंथालयांना दुप्पट अनुदान देण्याचा शासनाचा निर्णय मार्च २००५ मध्ये झाला असताना १२०० ग्रंथालयांना त्यापासून वंचीत ठेवल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. सदर प्रकरणी मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांनी विधानसभेमध्ये दिलेल्या आश्वासनानुसार ग्रंथालयाची तपासणी करण्यात आली. अपीलकाराच्या ग्रंथालयांनी प्रत्यक्ष खर्च कमी केला त्यामुळे नियमानुसार देय असलेले तदर्थ अनुदान व नियमित अनुदान अदा करण्यात आले. राजाराम सिताराम दीक्षित वाचनालयास सन २००४-०५ मध्ये रु.२.४० लक्ष इतके वेतनेत्तर अनुदान अदा केले. तितकीच रक्क्म वाढीव तदर्थ अनुदान म्हणून अदा करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास माहिती दिली असल्याचे दिसून येते. य परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील अमान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२५/०२**

**श्री.विश्वनाथ गंगाराम खांडेकर**
**कास्ट्राईब रा.प.कर्मचारी संघटना,**
**नागपूर विभाग, नागपूर. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतूक)**
**मध्यवर्ती राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन,**
**डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक (चालन)**
**मध्यवर्ती राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन,**
**डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विश्वनाथ गंगाराम खांडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिका-याकडे अपीलकाराने दि.२४.०८.२००७ रोजी अर्ज करून राज्य परिवहन महामंडळ व कामगार यांचेमध्ये झालेल्या कराराची अमंलबजावणी आगार पातळीपर्यंत होणे बंधनकारक आहे काय? असल्यास कशा पध्दतीने होते. तसेच कराराची अमंलबजावणी करणे महामंडळाला बंधनकारक आहे काय? याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-याने अपीलकारास दि.२८.०९.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी खुलाशेवार उदाहणासह माहिती न देता त्रोटक व मोघम माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिली प्राधिका-याकडे दि.२२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१४.११.२००७ च्या पत्रान्वये खुलाशेवार माहिती दिली. यामुळे समाधान झाले नाही तर दि.२०.११.२००७ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता सुनावणीकरिता उपस्थित राहणेबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१४.११.२००७ च्या पत्रान्वये

कळविले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.३१.०१.२००९ रोजी जिल्हाधिकारी नागपूर यांच्या कार्यालयातील व्हिडीओ कॉन्फरन्स रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता अपीलदार, जन माहिती अधिकारी, प्रथत अपिलीय प्राधिकारी हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०८.२००७ रोजी अर्ज करुन राज्य परिवहन महामंडळ व कामगार यांचेमध्ये झालेल्या कराराची अमंलबजावणी आगार पातळीपर्यंत होणे बंधनकारक आहे काय? असल्यास कशा पध्दतीने होते.  तसेच कराराची अमंलबजावणी करणे महामंडळाला बंधनकारक आहे काय? याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.०९.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१४.०९.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सच्या सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.  खुलाशेवार माहिती दिली नाही.  त्रोटक व मोघम स्वरुपाची माहिती दिली असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी त्यांच्या नागपूर येथील राज्य परिवहन मंडळाच्या कार्यालयात अपीलकारास संबंधीत कागदपत्र तपासणीकरिता उपलब्ध करुन द्यावीत.  त्यानंतर मागणीप्रमाणे अपीलकारास उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२६/०२**

**श्री.भिमराव गणूजी वानखेडे**
**आरे कॉलनी प्लॉट नं.२९,**
**नविन सुभेदार ले आउट,**
**नागपूर-२४.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.भिमराव गणूजी वानखेडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०९.२००७ रोजी अर्ज करुन कु.भाग्यश्री पुंजे, सह शिक्षीका यांच्या नियुक्ती / मान्यता प्रकरणात शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराचा दि.०५.०५.२००७ चा अर्ज संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी शासन पत्र क्रमांक संकीर्ण २००७/३९८२/२६७७/माशि-४, दि.२४ ऑक्टोंबर, २००७ अन्वये पाठविण्यात आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२९.१०.२००७ रोजी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-याने अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर

दि.३१.०१.२००९ रोजी नागपूर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रातील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने कु.भाग्यश्री आ.पुंजे, सह शिक्षीका यांच्या नियुक्तीमध्ये शिक्षण उप संचालक नागपूर विभाग, नागपूर यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत दि.०५.०५.२००७ रोजी सचिव, शालेय शिक्षण यांचेकडे पाठविलेला अर्ज मिळाला का? सचिव, शालेय शिक्षण यांना प्रस्ताव दि.२३.०६.२००७ रोजी दिलेले पत्र मिळाले का? त्यावर कार्यवाही केली याबाबतचा तपशिल अपीलकाराने मागीतला होता. अपीलकाराने केलेली तक्रार संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडे पाठविली असल्याचे जन माहिती अधिका-याने अपीलकारास कळविले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढयात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६३०/०२**

**प्रा.देवेंद्र चंद्रशेखर वानखेडे**
**अे.ए.डाखोळे, गल्ली क्र.९,**
**विश्वकर्मा नगर, नागपूर ४४० ०२७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार प्रा.देवेंद्र चंद्रशेखर वानखेडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०९.२००७ रोजी अर्ज करुन प्राद्यापकांच्या पदोन्नती संदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (त्र) आपणास आवश्यक असलेले आदेश/शासन निर्णय याचा क्रमांक व दिनांक नमुद केल्यास त्याची प्रत उपलब्ध करून देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९ मार्च, २००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.०५.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.०९.०५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.३१.०१.२००९ रोजी जिल्हाधिकारी नागपूर यांचे व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रातील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने महाविद्यालयीन प्राध्यापकाच्या पदोन्नतीबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. उक्त अधिनियमातील कलम-२ (त्र) चा आधार घेउन माहिती नाकारली. राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपीलावर व्हीडीओ कॉन्फरन्सवर सुनावणी आयोजित केल्यानंतर दि.२३ जानेवारी, २००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने सुनावणीचेवेळी सांगीतले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकारास माहिती मिळाली नाही. तेव्हा जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत नोंदणी पोच देय डाकेने अपीलकारास माहिती पाठवावी.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२९/०२**

**श्री.मिलिंद श्रावण खैरकर**
**मंजुळ श्रावण, आंबेडकर वाचनालयाजवळ,**
**कर्नलबाग, नागपूर-२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,**
**पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, सेंट जार्ज किल्ला,**
**सेंट जार्ज रूग्णालय आवार, छत्रपती शिवाजी टर्मिनल जवळ,**
**मुंबई - ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मिलिंद श्रावण खैरकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकाराने दि.०६.०९.२००७ रोजी अर्ज करून पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई व त्यांचे अधिनस्त विभाग कार्यालयात कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता, जतन सहाय्यक, उप आवेक्षक व तांत्रिक सहाय्यक या पदावर कार्यरत सर्व मागासवर्गीय कर्मचा-यांची जात पाडताळणी व वैद्यता प्रमाणपत्राची माहिती व त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती मागीतली होती. तसेच सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर कार्यालयातील कामाची माहिती मागीतली होती.

अर्जातील बाब क्र.१ ची माहिती पाठविण्यात आली आहे. बाब क्र.२ ची माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे. सदरील माहिती तयार होताच कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. दरम्यान अर्जातील मुध्दा क्र.२ बाबत माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, पर्यटन व

सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.३१.०१.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांनी व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, पुरातत्व विभाग नागपूर कार्यालयातील कामाबाबत अनुषंगीक माहिती मागासवर्गीय कर्मचा-यांच्या जातीप्रमाणपत्र पडताळणीबाबत माहिती मागीतली होती. अर्जातील मुध्दा क्र.१ बाबत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली. मुध्दा क्र.२ बाबत माहिती दिली नसल्याच्या अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देता की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देता आहे.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२२/०२**

**श्री.प्रकाश मुकूंदराव पंत**
**सदस्य, सिटीझन्स फोरम महाराष्ट्र,**
**एम-५, प्रिमियम प्लाझा, २४२, खरे टाउन,**
**धरमपेठ, नागपूर ४४० ०१०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन,**
**गर्व्हमेंट डेंटल कॉलेज अँड हॉस्पीटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कम्पांउड,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**'ब' व 'क' शाखा**
**संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन,**
**गर्व्हमेंट डेंटल कॉलेज अँड हॉस्पीटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कम्पांउड,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रकाश पंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.१३.०८.२००७ रोजी अर्ज करुन रुग्णालयातील वैद्यकीय सेवा, कर्मचारी वर्ग व नियमित पदोन्नतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागीतलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. त्यास बराच कालावधी लागणार असल्याने, अपीलकारास कोणत्या कारणास्तव माहिती आवश्यक आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२२.०८.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१०.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास माहिती देण्यास फेटाळले नसून माहितीबाबतची वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे. सुनावणीसाठी कोणत्या दिनांकास

हजर राहणार आहात त्याचा वेळ व दिनांक संचालनालयास कळवावे असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांने अपीलकारास दि.२४.०९.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन रुग्णालयातील वैद्यकीय सेवा, कर्मचारी वर्ग व नियमित पदोन्नतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेल्या माहितीचे विस्तृत स्वरुप लक्षात घेता अपीलकारास आवश्यक माहिती देता आली नाही, असे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयातील सर्व संबंधीत धारीका / कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर अपीलकाराने निवडलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**<br>**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६१५/०२**

**श्री.संपत तुकाराम रामटेके**
**अध्यक्ष, सिकलसेल सोसा.ऑफ इंडिया,**
**७१२, उत्कर्ष निर्माण, सदर, नागपूर-१.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.संपत रामटेके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.१३.०२.२००८ रोजी अर्ज करुन सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.०३.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीन समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयातील व्हीडीओ कॉन्फरसींग रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यता आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची नियंत्रण कार्यक्रमाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन

माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.०३.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराशी अपीलकार सहमत नसल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचा तपशिल सुनावणीचेवेळी सादर केला. कार्यालयातील सर्व उलब्ध माहिती अपीलकारास देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवळी प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीचेवेळी हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६१४/०२**

**श्री.राजीव गजाननराव जगताप**
**सिटीझन्स फोरम महाराष्ट्र नागपूर,**
**एम-५, प्रिमियम प्लाझा, २४२ खरे टाउन,**
**धरमपेठे, नागपूर ४४० ०१०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र विज वितरण कंपनी,**
**प्लॉट नं.जी-९, प्रकाशगड,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र विज वितरण कंपनी,**
**प्लॉट नं.जी-९, प्रकाशगड,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.राजीव जगताप यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.०७.०९.२००७ रोजी अर्ज करून लोड शेडींगबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत दि.०६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांने दि.०७.०९.२००७ रोजी अर्ज करुन लोड शेडिंगबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरूध्द शास्ती लादण्याची कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२३/०२**

**श्री.प्रकाश मुकूंदराव पंत**
**सदस्य, सिटीझन्स फोरम महाराष्ट्र,**
**एम-५, प्रिमियम प्लाझा, २४२, खरे टाउन,**
**धरमपेठ, नागपूर ४४० ०१०. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रकाश पंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.११.१०.२००७ रोजी अर्ज करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयामधील विविध शाखा संबंधीत आस्थापनावरील अधिकारी व कर्मचारी यांची संपूर्ण माहिती पुरविणा-या वैद्यकीय संचालनालयातील अधिका-यांचे नाव पदनाम व कार्यालयाची माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१०.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रूममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.११.१०.२००७ रोजी अर्ज करून वैद्यकीय संचालनालयातील अधिका-याचे नाव पदनाव व कार्यालयाची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही व माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. जन माहिती अधिकारी व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिता हजर रहिले नाहीत. अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यासाठी जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरून त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का करु नये याबाबत हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६१९/०२**

**श्री.नाना हरिभाउ शेंडे**
**संपादक, वागदर्पण / नागनगर**
**व्दारा मिलिंदमित्र, आंबेडकर वाचनालयाजवळ,**
**कर्नलबाग, नागपूर-०२.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,**
**पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, सेंट जॉर्ज किल्ला,**
**सेंट जॉर्ज रूग्णालय आवार,**
**छत्रपति शिवाजी टर्मिनस जवळ,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.नाना हरिभाउ शेंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.०८.१०.२००७ रोजी अर्ज करुन संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रालय कार्यालयाच्या अधिनस्त नागपूर विभागीतील सहाय्यक संचालकाच्या कार्यालयात सन २००४-०५, २००५-०६ व २००६-०७ या कालावधीत किती निवीदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागीतलेली माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे. सदरील माहिती तयार होताच अपीलकारास कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. दरम्यानच्या कालावधीत जन माहिती अधिका-यांनी माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम

अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीच्यावेळी अपीलातील कागदपत्रातील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सन २००४ ते सन २००७ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आलेल्या निवीदा चौकशीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास निशुल्क माहिती नोंद पोच देय डाकेने उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनिमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२४/०२**

**श्री.विश्वनाथ गंगाराम खांडेकर,**
**विभागीय अध्यक्ष, कास्ट्राईब रा.प.कर्मचारी संघटना,**
**नागपूर विभाग, नागपूर.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक,**
**मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कामगार अधिकारी,**
**मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.विश्वनाथ गंगाराम खांडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.२४.०८.२००७ रोजी अर्ज करून राज्य परिवहन महामंडळ व कामगार यांचेमध्ये झालेल्या कराराची अमंलबजावणी आगार पातळीपर्यंत होणे बंधनकारक आहे काय? असल्यास कशा पध्दतीने होते? तसेच कराराची अमंलबजावणी करणे महामंडळाला बंधनकारक आहे काय? या विषयाची अनुषंगीक सविस्तर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.११.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन राज्य परिवहन महामंडळ व कामगार यांचेमध्ये झालेल्या कराराच्या अमंलबजावणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने अपूर्ण दिशाभूल करणारी माहिती दिली. यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी नागपूर येथील कार्यालयातील संबंधीत कागदपत्र अपीलकारास तपासणीकरिता उपलब्ध करुन द्याव्यात. त्यांनतर अपीलकाराने निवडलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरविण्यात याव्यात.

**आदेश**

अपील अंशत: मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६२१/०२**

**श्री.प्रकाश मुकूंदराव पंत**
**सदस्य, सिटीझन्स फोरम महाराष्ट्र,**
**एम-५, प्रिमियम प्लाझा, २४२, खरे टाउन,**
**धरमपेठ, नागपूर ४४० ०१०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
**दक्षता व सुरक्षा संचालनालय, म.रा.वि.वि.कं.मर्या,**
**३ रा माळा, हाँगकाँग बँक इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**दक्षता व सुरक्षा संचालनालय, म.रा.वि.वि.कं.मर्या,**
**३ रा माळा, हाँगकाँग बँक इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रकाश पंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.०८.२००७ रोजी अर्ज करुन श्री.डी.के.कडू, कनिष्ठ दक्षता अधिकारी, नागपूर यांच्याबाबत दि.१४.०७.२००७ रोजी दिलेल्या तक्रारीवर संचालक (द व सू) कार्यालयाने काय कार्यवाही केली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.११.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रुममध्ये दि.३१.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रातील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे माहितीच्या अधिकारात दि.१७.०८.२००७ रोजी अर्ज करुन श्री.डी.के.कडू, कनिष्ठ दक्षता अधिकारी, नागपूर यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत निशुल्क माहिती पुरवावी अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९५६/०२**

**श्री.नारायणदास से. चंदनानी**
**लॅन्डलॉर्ड, ६/सी, २ रा मजला,**
**रूम नं.२३/२४, एस.एस.नगर,**
**सायन कोळीवाडा, मुंबई ४०० ०३७.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, बी विभाग कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, बी विभाग कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.नारायणदास चंदनानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.०८.२००८ रोजी अर्ज करून बिल्डींग क्र.१७४ सेवाकुंज, मुंबई बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करुन बिल्डींग क्र.१७४ सेवाकुंज, मुंबई या इमारतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती लादण्यांत येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९०३/०२**

**ॲड. अजित जे. केंजळे**
**१०६/ए, शिवशक्ती पार्क,**
**सिताराम मिलसमोर,**
**एन.एम.जोशी मार्ग,**
**मुंबई ४०० ०११.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव (आस्थापना),**
**गृह विभाग (आस्था-२),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृह विभाग (आस्था-२),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार ॲड.अजित जे.केंजळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.३०.०६.२००८ रोजी अर्ज करून गृह विभागातील गट अ, ब, क मधील अधिकारी / कर्मचारी यांचे मत्ता व दायित्वाबाबतची अनुषंगीक माहिती मागीतली होती.

गृह विभागातील गट अ, ब, क मधील अधिकारी / कर्मचा-यांची एकूण संख्या, मत्ता व दायित्वाची विवरणपत्र सादर करण्याबाबत निर्गमित केलेल्या आदेशाची प्रत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०७.२००८ च्या पत्रान्वये दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यानी सुनावणी आयोजित करून दि.२०.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१२.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन गृह विभागातील गट अ, ब, क मधील अधिकारी / कर्मचा-यांची मत्ता व दायित्व विवरणपत्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

मत्ता व दायित्वासंबंधी शासनाने दि.३१.१०.१९९६ रोजी निर्गमित केलेल्या पत्राची प्रत अपीलकाराने मागणी केल्यास ती त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिका-यांना निदेश देउन अपील निकाली काढले. जन माहिती अधिका-यांनी दि.११.०७.२००८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली. २३६ अधिकारी / कर्मचा-यांनी मत्ता व दायित्वाची विवरणपत्र सादर केले आहेत. मत्ता व दायित्वाची विवरणपत्र भरुन देणेबाबत दि.११.०७.२००८ रोजी परिपत्रक काढून सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले नाही. अधिकारी / कर्मचा-यांनी सादर केलेल्या मत्ता व दायित्वाच्या विवरणपत्राच्या साक्षांकित प्रती देण्याची अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. सदर माहिती अपीलकारास पुरविलेली दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागीतलेली माहिती द्यावी.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८४४/०२**

**श्री.कैलास हनुमंत भोरडे**
**सर्व्हे क्र.४७/२६, पर्वती, अरब्येश्वरनगर,**
**पुणे ४११ ००९.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मा.संचालक,**
**पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन,**
**१५६, एलफिन्स्टन महाविद्यालय इमारत,**
**महात्मा गांधी रोड, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन,**
**१५६, एलफिन्स्टन महाविद्यालय इमारत,**
**महात्मा गांधी रोड, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.कैलास भोरडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.१९.०५.२००८ रोजी अर्ज करून पुराभिलेख विभागातील एकूण ५ नकाशाच्या प्रतीची मागणी केली होती.

अपीलकाराने मागणी केलेले नकाशे उपलब्ध आहेत. मात्र नकाशे आकाराने मोठे व जीर्ण झालेले असल्याने त्यांच्या छायाप्रती काढण्याची सुविधा कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तरी अपीलकाराने स्वत: डिजीटल कॅमे-याने फोटो काढू शकता किंवा अपीलकाराच्या प्रतिनिधीने कार्यालयास भेट दिल्यास त्यांना आवश्यक ते सहकार्य केले जाईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.०९.०६.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.२९.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेल्या नकाशाची पहाणी केली असता सदर नकाशे प्रतिमुद्रीत यंत्राच्या आकारापेक्षा मोठे आकाराचे आहेत. त्यामुळे त्यांचे झेरॉक्स लहान

लहान भागामध्ये करावे लागतील. या पध्दतीने झेरॉक्स मशिनवर झेरॉक्स काढल्यास एकसुत्रीपणा येणार नाही. त्यापेक्षा सदर नकाशाचे डिजीटल कॅमे-याने छायाचित्रण करणे सोईस्कर होईल. यामुळे नकाशांना कोणतीही इजा पोहचणार नाही. झेरॉक्स काढतांना नाकाशांना इजा पोहचण्याची शक्यता आहे. असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने पुराभीलेख विभागातील ५ नकाशांची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेले नकाशे फार जुने असून मोठया आकाराचे आहेत. त्याच्या झेरॉक्स मशिनवर फोटोप्रती काढतांना नकाशांना इजा पोहचू शकेल. म्हणून नकाशाच्या डीजीटल कॅमे-याने फोटो काढून घ्याव्यात असे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अर्जावर अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे ओदश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २७.०२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१३९०/०२**

**श्री.सिरील पिटर डिसोझा**
**गुडलक चाळ, रूम नं.१८,**
**साई संकल्प बिल्डिंगजवळ,**
**बी.एम.सी.कॉलनी समोर,**
**मालवणी, ब्लॉक क्र.३,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०९५.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३ रा मजला,**
**विस्तारित इमारत, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**५ वा मजला,**
**विस्तारित इमारत, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सिरील डिसोझा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे दि.०६.०५.२००८ रोजी अर्ज करुन महानगरपालिका इमारत प्रस्ताव खात्याचे कार्यकारी अभियंता श्री.व्ही.आर.कोरान्ने व श्री.व्ही.एच.पाटील यांची बदली आजतागायत का केली नाही याबाबत अनुषंगीक ५ मुद्याबाबत माहिती मागीतली होती.

अपीलकाराने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे माहितीच्या अधिकाराच्या व्याख्येत येत नसल्यामुळे ती माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.०५.२००८ च्या पत्रान्वये

कळविले.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०२.०६.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले.  सदर अपीलावर दि.१७.०६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकालात काढण्यात आले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.  सदर अपीलावर दि.०५.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते.  अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.व्ही.आर.कोरान्ने, कार्यकारी अभियंता व श्री.व्ही.एच.पाटील, कार्यकारी अभियंता यांच्या बदली बाबत एकूण ५ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकाराने मागीतलेली माहिती उक्त अधिनियमाच्या व्याख्येत येत नाही त्यामुळे अपीलकारास माहिती देता येत नाही.  अशी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी घेतलेली भुमीका योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.  अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८१०/०२**

**श्री.प्रल्हाद माधवराव केदार**
**मुख्यलेखापाल, वन्यजिव विभाग,**
**आकोट, वै.रजेवर,**
**जिजामाता नगर, प्रफुल्ल निवास,**
**मु.पो.ता.जि.बुलडाणा. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रल्हाद केदार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०४.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारांने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मा.राज्यपालांना केलेल्या विनंती अर्जावर चौकशी करुन न्याय द्यावा किंवा इच्छा मरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती.

माहितीपोटी एकूण रु.८७/- इतकी रक्कम चलनाव्दारे जिल्हा कोषागारात भरुन चलनाची मुळ प्रत शासनास सादर करावी. जेणेकरुन मागीतलेली माहिती डाकेने पाठविणे शक्य होईल. असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०१.२००७ च्या पत्रान्वये कळविले व दि.०३.०२.२००७ च्या पत्रासोबत आवश्यक माहिती अपीलकारास पाठवून दिली. अपूर्ण व काही माहिती चुकीची व काही न मागीतलेली माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०५.०३.२००७ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. अपीलकाराने मागीतलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची दिसून येते. मागणीनुसार कार्यासनात उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती अपीलकारास पुरविण्यात आल्या

असल्याचे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रुममध्ये दि.२०.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मा.राज्यपालाकडेम केलेल्या विनंती अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या मागणीनुसार कार्यासनात उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविल्या आहेत. सदर माहिती अपूर्ण असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. अपीलकाराच्या अर्जातील मुद्यानुसारच त्यांना आवश्यक ते सर्व दस्तऐवज पुरविण्यात आले आहेत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१६१८/०२**

**श्री.प्रदीप रेवाराम सहारे**
**राहुलवाचनालय जवळ, खळाशी लाईन,**
**लालाचा बाग, मोहन नगर, नागपूर - ४४० ००१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मनुष्यबळ विकास विभाग**
**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या.**
**कृपनिधी, बेलार्ड इस्टेट, ९ वालचंद हिराचंद मार्ग,**
**मुंबई - ४०० ०००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मनुष्यबळ विकास विभाग**
**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या.**
**कृपनिधी, बेलार्ड इस्टेट, ९ वालचंद हिराचंद मार्ग,**
**मुंबई - ४०० ०००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रदिप रेवाराम सहारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे दि.२७.१०.२००७ रोजी अर्ज करुन वार्षिक वेतन वाढ मिळणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

माहितीच्या अधिकारातील अर्जावर चिकटविलेले कोर्ट फी स्टँप वैद्य नसल्यामुळे अर्ज निकालात काढण्यात आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१३.११.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये दि.३०.०१.२००९ रोजी

सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन वार्षिक वेतन वाढ मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**